॥ श्रीराम ॥

= आरसा =

सहज आरशासमोर उभी होते, त्यावरून मनात आले की आरशावर लिहावे.

आरसा म्हटले की विशेषत: स्त्री जातीला त्यांचे जास्त आकर्षण असते. पुर्वी माझ्या आजीकडे आरशाची पेटी होती. त्यामध्ये हळदी कुंकवाचा करंडा, फणी, कंगवा, व एक भोकाचा पैसा असे. माझी आजी तो पैसा कपाळावर ठेवून त्या भोकामध्ये कुंकू लावी व मग पैसा काढे. किती छान दिसे. पुर्वी मेणाचे पिंजर घालुन केलेले कुंकू असे.

आम्ही पेटी जवळ गेलो की म्हणे सावकाश बघा हं, त्याची काच बिलोरी आहे. आम्हाला खुप मजा वाटे.

मग विचार मनात आला की आरशाचा शोध कधी लागला व कोणी लावला?

मानवाने जेव्हा पाण्यात आपले प्रतीबिंब पाहीले, त्यावरून त्याला काचेपासुन आरसा तयार करण्याची कल्पना सुचली. इ.स. १८३५ मध्ये जर्मन शास्त्रज्ञ वॉन लिबीग यांनी सर्व प्रथम स्वच्छ काच घेवून तीच्या मागे चांदीचा पातळ थर दिल्याने प्रतिबिंब बाहेर न जाता स्पष्ट त्याची प्रतिमा दिसु लागली. त्यानंतर त्यामध्ये वैज्ञानीक सुधारणा होत जाऊन आरसा बनविण्याची पद्धत सुरु झाली.

मग काय विविध आकाराचे आरसे तयार करून ते रोजच्या व्यवहारात आजच्या जगात त्यांचा उपयोग होत आहे. मुलांच्या खेळण्यात, प्रत्येक वहानात, छायाचित्रणात फॅशन जगतात, वैज्ञानीक उपकरणात, देवालयातून, वेगवेगळ्या आरशांचा उपयोग केला जात आहे. मनोरंजनात तर आरशांची वेगळीच दुनिया आहे. घराघरामध्ये तर कपाटाला आरसा बाथरुम मध्ये आरसा, आरशा शिवाय चालतच नाही.

आरशाचे महत्व पुरातन काळ पासुन आहे. श्रीरामांना सुध्दा आरशात चंद्राचे प्रतिबिंब दाखवून त्यांची समजूत काढली होती.

आरसा केवळ प्रत्येक वस्तूचे प्रतिबिंब नाही त्याची ओळख दाखवितो. आपण रोजच्या व्यवहारात काही झाले की म्हणतोच जरा आरशात बघ म्हणजे तुझे तुलाच कळेल.

असा हा बहुगुणी आरसा, सर्व जगामध्ये सर्वांना सर्व ठिकाणी हवा हवासा वाटणारा आहे.

(मृणालिनी कुलकर्णींच्या गुलदस्ता मधून)




सुनिता श्रीधर पटवर्धन.

फोन नं. 9404413853




